वाचले:- 1. म.उपसचिव, म.शा.,महिला व बाल विकास विभाग,मुंबई-32,यांचे शासन निर्णय क्रं. एबावि- 2005/प्र.क्रं.233/का-5 , दिनांक 05.04.2006.

2.म.उप आयुक्त (आरोग्य व पोषण),महिला व बाल विकास,आयुक्तालय, 28 राणीचा बाग, पुणे-01, यांचे पत्र क्रमांक मबाविआ/एबाविसेयो/का-2/3506/2011, दिनांक 02.09.2011.

3. म.आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,आयुक्तालय, रायगड भवन (रिअर विंग) ,पहिला मजला, सीबीडी,बेलापूर,नवी मुंबई 400614, यांचे पत्र क्रं. एबाविसेयो/का-2/2958/2015,दिनांक 28.10.2015

4.बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी),भुसावळ यांचे पत्र क्रमांक बाविप्रअ/नाभुसा/675/ 2015,दिनांक 4.11.2015

***************

क्रं/पुरवठा/हालचाल/ पुप्र/3री तिमाही/फकावी/ 413 /2015
जिल्हाधिकारी जळगांव यांचे कार्यालय,
दिनांक 10 /11/2015

आ दे श

केंद्र शासनाचे गहू आधारित पोषण आहार योजनेअंतर्गत , एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत म.आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,आयुक्तालय, रायगड भवन (रिअर विंग) ,पहिला मजला,सीबीडी,बेलापूर,नवी मुंबई 400614, यांनी त्यांचे पत्र क्रं. एबाविसेयो/का-2/2958/2015,दिनांक 28.10.2015 चे पत्रानुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी),भुसावळ जिल्हा जळगांव यांना माहे **ऑक्टोबर 2015 ते डिसेंबर 2015** या तिस-या तिमाहीकरिता भुसावळ प्रकल्पांतील विभागातील **150** अंगणवाड्यांसाठी **तांदुळ 80 क्विंटल आणि गहू 182 क्विंटल** मंजूर केला असून त्याची मागणी त्यांनी त्यांचे पत्र क्रमांक जाक्रं. बाविप्रअ/नाभुसा/675/ 2015,दिनांक 4.11.2015 अन्वये इकडील कार्यालयात केली आहे.

म.जिल्हाधिकारी यांचे आदेश क्रं.पुरवठा/हालचाल/बाविप्रअ/WBNP-भुसा.प्र/कावी/406/2015,दि. 06.11.2015 नुसार म. व्यवस्थापक,भारतीय खाद्य निगम महामंडळ, मनमाड यांचेकडे रक्कम रुपये 1,20,730/- जमा करण्यात येवून त्यांचेकडुन **Wheat Based Nutrition Programme** अंतर्गत बीपीएल दराचा **गहू 182 क्विंटल डी.ओ.क्रं. 383 दिनांक 07.11.2015 व I तांदुळ 80 क्विंटल डी.ओ.क्रमांक 384 दिनांक 07.11.2015** या कर्ती फ्लोअर्स प्रा.लि.ममुराबाद ता. जळगांव गोदाम येथून दिनांक **25.12.2015** पावेतो उचल करण्यासाठी प्राप्त झाले आहे.

**मी जिल्हाधिकारी जळगांव याआदेशाव्दारे मंजूरी देत आहे की, भुसावळ प्रकल्पासाठी प्राप्त झालेले नियतन खालील तालुकानिहाय सर्व 150 अंगणवाड्यांना महिला मंडळ,महिला संस्था,महिला बचत गट यांना 3 ते 6 वर्षे वयोगटातील** लाभार्थ्यांना ऑक्टोबर 2015 ते डिसेंबर 2015 या तिस-या तीमाहीकरिता मंजुर करण्यात येत आहे. अंगणवाडीमध्ये THR आहारासाठी अंगणवाडीनिहाय तहसिलदार मार्फत स्वस्तधान्य दुकानातून संदर्भिय शासन निर्णय क्रमांक 1 नुसार सुचविलेल्या दरानुसार विक्री करण्यात यावी.

| अ .क्रं | महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचत गटाचे नांव | अंगणवाडी संख्या | मंजूर नियतन वजन - कि. ग्रॅम मध्ये | |
|---|---|---|---|---|
| | | | तांदुळ | गहू |
| 1 | चाळीसगांव विभाग | | | |
| | 1.गाडगेमहाराज महिला बचत गट,नेताजीचौक,40 गांव | 1 | 53.330 | 121.330 |
| | 2.संताजी महिला बचत गट नवागांव,चौधरीवाडा,40 गांव | 1 | 53.330 | 121.330 |
| | 3.स्वामीनी महिला बचतगट,नवागांव,जुनापावरहाऊस जवळ चाळीसगांव | 4 | 213.330 | 485.330 |
| | 4.नालंदा महिला बचतगट,रेल्वेलाईनजवळ,लक्ष्मीनगर, चाळीसगांव | 1 | 53.330 | 121.330 |
| | 5.अष्टविनायक महिला बचत गट गांधी चौक, 40 गांव | 4 | 213.330 | 485.330 |
| | 6.जय गजानन महिला विकास सामाजिक शैक्षणीय बहुउद्देशीय संस्था, - नेताजी चौक, चाळीसगांव | 1 | 53.330 | 121.330 |
| | 7.जय तुळजाभवानी महिला बचतगट,सौ वैशाली विनोद देशमुख, धुळेरोड,तेजस कॉर्नर चाळीसगांव | 2 | 106.670 | 242.670 |
| | 8.लुबीनी मागासवर्गीय महिला बचत गट, नवागांव 40 गांव | 3 | 160.000 | 364.000 |
| | 9.राजेश्वरी महिला बचत गट गोपाळपुरा नवागांव 40 गांव | 3 | 160.000 | 364.000 |
| | 10.कमलाबाई महिला बचत गट पवारवाडी,सुवर्णा ताई देशमुखनगर, चाळीसगांव | 2 | 106.670 | 242.670 |
| | 11.गौतमी मागासवर्गीय महिला बचतगट भिमनगर,नवागांव 40 गांव | 2 | 106.670 | 242.670 |
| | 12.फिनिक्स महिला बचत गट नवागांव चाळीसगांव | 10 | 533.330 | 1213.330 |
| | 13.सिताई महिला बचत गट गोपाळपुरा नवागांव 40 गांव | 2 | 106.670 | 242.670 |
| | 14.गुंजन महिला बचत गट जुने विमानतळ चाळीसगांव | 1 | 53.330 | 121.330 |
| | 15.रेणुकामाता बचतगट,गोसावीगल्ली,चौधरीवाडा,40 गांव | 1 | 53.340 | 121.330 |
| | 16.स्वामी महिला बचतगट,सेंट्रलनाक्यासमोर 40 गांव | 3 | 160.000 | 364.000 |
| | 17.धनलक्ष्मी महिला बचतगट,श्री वसंतराव धोंडू देवकर,कैवल्य नगर, हिरापूररोड, चाळीसगांव | 4 | 213.330 | 485.330 |
| | 18.प्रियदर्शनी महिला बचतगट,शिवाजीघाट,40 गांव | 9 | 480.000 | 1092.000 |
| | 19.जय तुळजाभवानी महिला संस्था ,वाल्मीकनगर,घाटरोड चाळीसगांव | 4 | 213.330 | 485.330 |
| | 20.दिशा महिला बचतगट,शाळा नंबर 1 चाळीसगांव | 1 | 53.340 | 121.330 |
| | 21.समता मागासवर्गीय महिला बचतगट,भिमनगर, नवागांव चाळीसगांव | 2 | 106.670 | 242.670 |
| | एकूण किलो ग्रॅममध्ये | 61 | 3253.330 | 7401.330 |
| | [illegible] | | 32.53.330 | 74.01.330 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | भुसावळ विभाग | | | |
| | 22.लोकशाही महिला गृह अद्योग सह.सोसा.लि.जळगांव ,सि.स.-नं.3105 क 26/अ/3,जळगांव | 20 | 1066.670 | 242[illegible].670 |
| | 23.रत्ना महिला गृहउपयोगी बस्तू उत्पादन वितरण औद्योगीक सह संस्था मर्या.रत्नभवन,तांबटगल्ली जळगांव | 25 | 1333.330 | 3033.330 |
| | 24.श्री.महिला बचतगट,LICकॉलानी,आनंदनगर,भुसावळ | 20 | 1066.670 | 2426.670 |
| | **एकूण किलो गॅममध्ये** | 65 | 3466.670 | 7886.670 |
| | **एकूण क्विंटल-किलो ग्रममध्ये मध्ये** | | **34.66.670** | **78.86.670** |
| 3 | रावेर विभाग | | | |
| | 25.प्रगती महिलाबचतगट उटखेडरोड, रावेर | 2 | 106.670 | 242.670 |
| | 26.राधाकृष्ण महिला बचतगट,राधाकृष्णनगर,एसकेऑईल मीलच्या मागे जळगांव | 3 | 160.000 | 364.000 |
| | **एकूण किलो गॅममध्ये** | 5 | 266.670 | 606.670 |
| | **एकूण क्विंटल-किलो ग्रममध्ये मध्ये** | | **2.66.670** | **6.06.670** |
| 4 | सावदा विभाग | | | |
| | 27.संकल्प महिला बचत गट जुनारावेर रोड,विवरेहॉस्पीटल जवळ सावदा | 1 | 53.330 | 121.330 |
| | 28.समर्थ महिला बचतगट,नवदुर्गा हौ.सो.फैजपूर | 1 | 53.340 | 121.340 |
| | **एकूण किलो गॅममध्ये** | 2 | 106.670 | 242.670 |
| | **एकूण क्विंटल-किलो ग्रममध्ये मध्ये** | | **1.06.670** | **2.42.670** |
| 5 | फैजपूर विभाग | | | |
| | 29.कमलशांती महिला बचतगट,मन्यारवाडा,फैजपूर, | 2 | 106.670 | 242.670 |
| | 30.आदिशक्ती महिला बचतगट,न्हावी दरवाजा,फैजपूर | 1 | 53.330 | 121.330 |
| | **एकूण किलो गॅममध्ये** | **3** | **160.000** | **364.000** |
| | **एकूण क्विंटल-किलो ग्रममध्ये मध्ये** | | **1.60.000** | **3.64.000** |
| 6 | यावल विभाग | | | |
| | 31.सरस्वती महिला बचतगट,295,हनुमान मंदीर पंचवटी,यावल | 1 | 53.330 | 121.330 |
| | 32.शिवशक्ती महिला बचत गट सुंदरनगरी यावल | 2 | 106.670 | 242.670 |
| | 33.कल्याणी महिला बचतगट,गांधीचौक, यावल | 2 | 106.670 | 242.670 |
| | 34.प्रेरणा महिला स्वयंसहाय्यता महिला बचतगट,वारीवाडा, मेनरोड , यावल | 1 | 53.330 | 121.330 |
| | 35.माता भगवती महिला बचतगट नगर परिषद अंतर्गत यावल | 1 | 53.330 | 121.330 |
| | **एकूण किलो गॅममध्ये** | 7 | 373.330 | 849.330 |
| | **एकूण क्विंटल-किलो ग्रममध्ये मध्ये** | | **3.73.330** | **8.49.330** |
| 7 | पाचोरा विभाग | | | |
| | 36.ओम साई महिला बचतगट,बाहेरपुरा, पाचोरा | 2 | 106.670 | 242.670 |
| | 37.केला देवी महिला बचत गट भास्करनगर, अनिकेत निवास पाचोरा | 1 | 53.330 | 121.330 |
| | 38.अनन्या महिला बचत गट शिवकॉलानी पाचोरा | 1 | 53.330 | 121.330 |
| | 39.शांताई महिला बचतगट गाडगेबाबानगर,जुना अंतुर्लीरोड , पाचोरा | 1 | 53.330 | 121.330 |
| | 40.साईश्रध्दा महिला बचतगट,जुना पावर हाऊस रोड, पाचोरा | 2 | 106.670 | 242.670 |
| | एकूण किलो गॅममध्ये | 7 | 373.330 | 849.330 |
| | एकूण क्विंटल-किलो ग्रममध्ये मध्ये | | **3.73.330** | **8.49.330** |
| | **एकूण एकंदर क्विंटल-किलो ग्रममध्ये मध्ये** | 150 | **80.00.000** | **182.00.000** |

उपरोक्त नियतन मंजुरीचे आदेशानुसार, तालुक्यातील अंगणवाडीनिहाय स्वस्तधान्य दुकान निहाय नियतन काढतांना खालील निर्देशांचे तंतोतंत पालन सर्व तहसिलदार यांनी करावे.

1. धान्याची ट्रक आल्यानंतर त्यातील धान्य विनाविलंब गोदामात उतरवून घ्यावे.
2. गोदामात उतरविणेत आलेल्या धान्याचे नियमानुसार प्रमाणीकरण करणेत यावे.
3. योजनानिहाय गहू/तांदूळ या धान्याच्या स्वतंत्र थप्प्या गोदामात लावणेत याव्यात .
4. मंजूर करणेत आलेल्या नियतनापेक्षा जास्त धान्य प्राप्त झाल्यास, सदरचे धान्य गोदाम व्यवस्थापकाने उतरवून घेऊ नये. असे निदर्शनास आल्यास संबंधीत गोदाम व्यवस्थापकास /किपर जबाबदार धरणेत येईल. व त्यावरील येणारा सर्व खर्च संबंधितांकडून वसुल करणेत येईल.
5. गोदामातील धान्य साठा वितरण करतांना प्रथम गोदामातील जुना साठा **First In first out** या पध्दतीप्रमाणे वितरीत

6. वाहतूक प्रतिनिधी यांनी उपरोक्त नियतनानुसारच तालुकानिहाय समप्रमाणात धान्य पाठवावे.
7. संबंधीत तहसिलदार यांनी उपयोगीता प्रमाणपत्र नियमीतरित्या जिल्हा कार्यालयातील **संबंधीत** संकलनाकडेस पाठवावे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत आदेश 2001 नुसार उपयोगीता प्रमाणपत्र सादर न केल्यास व त्या अभावी पुढील महिन्यात शासनाकडून धान्य न मिळाल्यास त्याची जबाबदारी आपणावर राहिल.
8. धान्याचे वितरण करते वेळी धान्याचा नमुना तपासणेत यावा. धान्य खराब नसल्याची खात्री केले नंतरच स्वस्त धान्य दुकानदार यांना धान्य वितरीत करावे.
9. वाहतूक प्रतिनिधी यांनी धान्य उचल करण्या अगोदर धान्याचा दर्जा चांगला आहे किंवा नाही याची खात्री करावी. त्यासाठी अन्नमहामंडळाचे प्रतिनिधी समवेत संयुक्तरित्या तपासणी करावी व तसा रिपोर्ट सादर करावा.
10. मंजूर नियतनानुसार धान्य सर्व तालुक्यांना त्यांचे गोदामात पाठवावे. व धान्य व्यपगत होणार नाही याची दक्षता घ्यावी.
11. तालुक्यात स्वस्तधान्य दुकानदार निहाय रजिष्टर ठेऊन सदस्य संख्या /कार्डसंख्या विचारात घेऊन तहसिलदार यांनी नियतन मंजूर करावे.
12. गोदामातील शिल्लक साठा विचारात घेऊन स्वस्तधान्य दुकानदार यांना परमीटस् वितरीत करणेत यावीत.
13. गोदामात धान्य साठा शिल्लक नसतांना आगाऊ परमिटस् देण्यात येऊ नयेत.
14. एका योजनेतील धान्य दुस-या योजनेत वर्ग करावयाचे असल्यास तसा प्रस्ताव या कार्यालयात शासन निर्देशानुसार सादर करावा व मंजूरी मिळालेनंतरच धान्य वर्ग करावे. तसेच ज्या योजनेतील धान्य वर्ग करुन घेतले आहे ते धान्य ज्यावेळेस प्राप्त होईल त्यावेळेस प्राधान्याने ते धान्य त्याच योजनेत वर्ग करुन समायोजीत करणेची कार्यवाही करावी. अन्यथा संबंधीतांना जबाबदार धरणेत येईल.
15. बपीएल दराचा WBNP अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचा भुसावळ प्रकल्पासाठी विभागनिहाय गहू/तांदुळ वरिल बचत गटांना स्वधादुमार्फत खालीलप्रमाणे दरानुसार देण्यात यावा..

| शिधावस्तू | केंद्रीय विक्री दर प्रती क्विं. | बहिगोदाम दर प्र.क्वि. | दुकानदाराचे मार्जिन प्र. क्वि. | किरकोळ विक्री दर प्रती क्वि. |
|---|---|---|---|---|
| गहू | रुपये 415 | रुपये 465 | रुपये 35 | रुपये 5.00 |
| तांदुळ | रुपये 565 | रुपये 633 | रुपये 42 | रुपये 6.75 |

10/11 10/11 10/11 10/11

**जिल्हाधिकारी जळगांव**

प्रत:- म.आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, आयुक्तालय, रायगड भवन (रिअर विंग), पहिला मजला सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई 400 614.यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- म. उप आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नाशिक विभाग नाशिक , नासार्डी पुलाजवळ, नाशिक क्लब जवळ, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- म.उप विभागीय अधिकारी, चाळीसगांव भाग चाळीसगांव, भुसावळ भाग भुसावळ, फैजपूर भाग फैजपूर, पाचोरा भाग पाचोरा.
प्रत:- म.जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी जळगांव यांना नियतनाची प्रसिध्दी जळगांव जिल्हयाचे अधिकृत संकेतस्थळावर www.jalgaon.nic.in वर प्रसिध्द करण्यासाठी सस्नेह अग्रेषीत.
प्रत:- बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी),गंगाराम प्लॉट नंबर 3105,बी-2/1 ते 2/4, राजेंद्र टॉवर, म्युन्सिपल हायस्कूलच्या पाठीमागे, भुसावळ जिल्हा जळगांव
प्रत:- तहसिलदार **चाळीसगांव, भुसावळ, रावेर, यावल, आणि पाचोरा** यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी
प्रत:- पुरवठा निरिक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, जळगांव यांना माहितीसाठी

2/-अन्नमहामंडळाच्या गोदामातून सदर योजनेतील गहू व तांदुळ महामंडळाचे गोदामातून उचल करण्यापुर्वी शासनाच्या निर्देशानुसार अन्नमहामंडळाचे प्रतीनिधिसमवेत संयुक्तरित्या धान्याचे नमुने घेण्यात यावेत धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक धान्य FAQ असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी .धान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर संयुक्तरित्या तपासणीचे वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व जिल्हाधिकारी जळगांव यांचे प्रतीनिधी ची नावे व त्यांचे पद स्वाक्षरी खाली असावीत व तपासणीचा दि. आणि स्थळ इ. चा संपूर्ण तपासणीच्या रिपोर्टसह माहिती शासनास सादर करण्यात यावी. तसे संबंधीत संकलनाकडे अवगत करावे.

प्रत:- सहाय्यक लेखाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, हिशोब शाखा, जळगांव यांना माहितीसाठी रवाना.
प्रत:- गोदाम व्यवस्थापक/किपर, पुरवठा हिशोब अव्वल कारकून, चाळीसगांव, **भुसावळ**, रावेर, यावल, आणि पाचोरा यांना **माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी** रवाना.
प्रत:- **म.व्यवस्थापक, एम.एस.डब्ल्यू.सी. /सीडब्ल्यूसी जळगांव** यांना माहितीसाठी रवाना.
प्रत:- **वाहतूक प्रतीनिधी जळगांव**

2/- वाहतूक प्रतीनिधी व FCI चे प्रतीनिधी यांनी डी.ओ.निहाय धान्य उचल करण्याअगोदर धान्याचे नमुने घेण्यात यावेत. ते धान्य मानवास खाण्यायोग्य आहे किंवा नाही याची तपासणीचा अहवाल या कार्यालयात सादर करण्यात यावा.

प्रत :- मे.राज ट्रॉन्सपोर्ट कं.लातूर,जळगांव जिल्हा वाहतूक ठेकेदार यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

2/- सदर मंजूर आदेशानुसार वाहतूक प्रतिनिधी यांनी विभाग निहाय समप्रमाणात धान्याची वाहतूक दिनांक **25.12.2015** चे पुर्वीच पुर्ण करण्यात यावी. नियतनापेक्षा कमी-जास्त धान्य कोणत्याही गोदामात पाठवू नये. नियतन व्यपगत झाल्यास त्यास ठेकेदार यांना संपूर्ण जबाबदार धरण्यात येईल . व्यपगत केलेल्या धान्याच्या बाजारभावाच्या किंमतीच्या 10 % इतकी रक्कम नियमानुसार ठेकेदार यांचेकडून वसूल करण्यात येईल. करिता धान्य व्यपगत करु नये.

**जिल्हाधिकारी जळगांव**

10/11 10/11 10/11 10/11